Indian Academy of Pediatrics (IAP)

महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## प्रकरण ३२ :

# पालकांसाठी मार्गदर्शक तत्वे विषय : विषमज्वर

ताप ४ ते ५ दिवसाच्या वर गेला आणि दिवसेंदिवस वाढत गेला की तपासण्या करून विषमज्वर तर नाही ना हे पाहणे जरुरी असते. विषमज्वराचा प्रसार, स्त्रोत, लक्षणे, निदान उपाय ह्याबाबत आज प्रश्नोत्तरांद्वारे जाणून घेऊ या


अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

अनुवाद : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

पुनरावलोकन : डॉ उपेंद्र किंजवडेकर, उज्ज्वल करमळकर

*Convener:* **Jaydeep Choudhury**

*Members:* **Dhanya Dharmapalan, Jai Singh, Suhas V Prabhu**

*Reviewer:* **Sangeeta Yadav**




## 10 FAQs on TYPHOID

१. एखाद्याला विषमज्वर कसा होतो ?

२. माझ्या मुलीला ५ दिवस खूप जास्त ताप येत आहे. हा विषमज्वर असेल का ? तिचा विडाल रिपोर्ट १:३२० असे प्रमाण दाखवत आहे. हे धोकादायक आहे का ?डॉक्टरांचे म्हणणे आहे की आपण ब्लड कल्चरच्या रिपोर्टची वाट बघावी मला समजत नाहीये मी काय करू ? कृपया मार्गदर्शन करा

३. माझ्या मोठ्या मुलीला विषमज्वर झाला आहे माझ्या धाकट्या मुलाला या मुली पासून विषमज्वर होऊ शकतो का ?

४. माझ्या मुलाला विषमज्वराचे उपचार चालू आहेत. उपचार सुरु केल्यावरून त्याचा ताप किती दिवसांमध्ये कमी यावा अशी अपेक्षा आहे ?

५. माझ्या मुलाचा ताप कमी येत नसल्यामुळे डॉक्टरांनी त्याला भरती होण्यासाठी सल्ला दिला आहे माझ्या मुलाला भरती केव्हा करावे ?

६. माझ्या मुलाला विषमज्वर झाला असता त्याला कोणत्या प्रकारचा आहार द्यावा ? कोणत्या प्रकारचे अन्न टाळावे ? तो मांसाहार करू शकतो का ?

७. माझ्या मुलीला विषमज्वर झाला होता. मी तिला शाळेला कधी पाठवू शकते ?

८. पूर्ण उपचार झाल्यावर आणि मूल पूर्ण बरे झाल्यावर देखील विषमज्वराच्या ताप उलटू शकतो का ?

९. माझ्या मुलीला एक वर्षांपूर्वी विषमज्वराच्या ताप आला होता तरी देखील मी तिला विषमज्वराची लस द्यावी का ?

१०. विषमज्वराची लस घेतली असताना देखील माझ्या मुलाला विषमज्वर होऊ शकतो का ?


**Under the Auspices of the IAP Action Plan 2020–2021**

**Piyush Gupta** — IAP President 2021

**Remesh Kumar R** — IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** — IAP President 2020

**GV Basavaraja** — IAP HSG 2020–2021

**Deepak Ugra** — National Co-ordinator



Ch-032.indd 1 23-09-2021 15:28:08

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** **Piyush Gupta, Bakul Parekh**
**IAP Co-ordinators:** **GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure**

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# 32

# पालकांसाठी मार्गदर्शक तत्वे विषय : विषमज्वर

प्रश्न (१)

## माझ्या मुलाला विषमज्वर कसा होतो ?

विषमज्वर म्हणजेच टायफाईड हा सालमोनेला टायफी किंवा सालमोनेला पराटायफी या जिवाणूमुळे होतो. हे जिवाणू शरीरामध्ये तोंडाद्वारे शिरतात. शिरण्याचा स्त्रोत अशुद्ध अन्न किंवा पाणी असू शकते. आतड्यात पोचल्यावर ते आतड्याच्या आत शिरून रक्ताभिसरणाद्वारे सर्व शरीरात पसरतात आणि त्यामुळे ताप तसेच इतर लक्षणे दिसू लागतात. विषमज्वर झालेल्या रुग्णाच्या विष्ठेमध्ये आणि लघवीमध्ये हे जंतू असतात आणि ते पाणीपुरवठ्यामध्ये मिसळू शकतात. खास करून पावसाळ्यात ह्याची शक्यता जास्त असते. याचसाठी पिण्याचे पाणी प्यायला देण्याअगोदर उकळून द्यावे. पुरेसे न शिजवलेले शिंपले, कच्च्या भाज्या आणि अशुद्ध दूध आणि दुधाचे पदार्थ हे देखील सालमोनेला जंतूंचे एक स्त्रोत असू शकतात.

**कॅरियर म्हणजेच वाहक कोणाला म्हणतात ?**

काही रुग्ण विषमज्वरापासून जरी बरे होतात आणि त्यांना कुठलीही लक्षणे दिसत नाहीत तरी त्यांच्या पित्ताशयामध्ये हे जंतू साठून राहतात आणि अनेक दिवसांसाठी (कधीकधी काही वर्षांसाठी) त्यांच्या विष्ठेद्वारे हे जंतू पसरतात. ह्यांना क्रॉनिक कॅरियर असे म्हटले जाते. हे अशा पद्धतीचे क्रोनिक कॅरियर हे समाजामध्ये विषमज्वराचा प्रसार करण्यास अतिशय महत्त्वाचा स्त्रोत ठरतात. अशा क्रॉनिक कॅरीयरनी तयार केलेले अन्न एखाद्या मुलाने शुद्धता न बाळगता खाल्ले तर त्या मुलाला या जंतूंचा प्रादुर्भाव होतो. याचे उत्तम उदाहरण आहे 'टाइफाइड मेरी' ही एक अमेरिकेमधील स्वयंपाकीण बाई होती जिने एकोणिसाव्या शतकात अनेक जणांना ह्या जंतूचा प्रसार केला होता.




**आकृती १ :** विषमज्वराचा प्रसार कसा होतो?

**प्रश्न (२)**

**माझ्या मुलीला ५ दिवस खूप जास्त ताप येत आहे. हा विषमज्वर असेल का? तिचा विडाल रिपोर्ट १:३२० असे प्रमाण दाखवत आहे. हे धोकादायक आहे का? डॉक्टरांचे म्हणणे आहे की आपण ब्लड कल्चरच्या रिपोर्टची वाट बघावी मला समजत नाहीये मी काय करू? कृपया मार्गदर्शन करा.**

ताप हे अनेक आजारांचे लक्षण असू शकते, ज्यात काही अगदी साधे स्वतः बरे होणारे जंतूसंसर्ग असू शकतात किंवा अतिशय धोकादायक आजार असू शकतात. सुदैवाने बरेचसे आजार हे स्वतः बरे होणारे विषाणूंचे आजार असतात. तापाची सुरुवात कशी होते, तापाचे स्वरूप, ताप उतरल्यावर मुलाचे वागणे कसे आहे यावरून आपल्याला सर्वसाधारण अंदाज बांधता येतो की हा ताप साधा विषाणूंचा आहे की जिवाणूंचा आहे. विषाणूंच्या तापात म्हणजे फ्लूसारख्या तापात तापाची सुरुवात जोरात होते आणि ४८ ते ७२ तासांत तापाचा जोर आणि ताप येण्याचे प्रमाण कमी होऊ लागते. महत्त्वाचे म्हणजे दोन तापांच्यामध्ये मूल ताजेतवाने आणि खेळकर असते. विषमज्वराचा ताप हा सुरुवात होताना कमी प्रमाणात असतो आणि हळूहळू तापाचे प्रमाण आणि ताप येण्याची वारंवारता वाढत जाते. ताप उतरलेल्या अवस्थेत मूल मलूल आणि शांत असते, अशा मुलांना उलट्या किंवा जुलाब होऊ शकतात. काहीजणांना श्वसन मार्गाची लक्षणे उदाहरणार्थ खोकला येऊ शकतो. जिभेवर पुटे चढलेली दिसतात. दुसऱ्या आठवड्यात अतिशय सूक्ष्म स्वरूपात रोज 'स्पॉट' नावाचा पुरळाचा प्रकार बघायला मिळतो. शक्यतो जी मुले गोरी असतात त्यांच्या




Ch-032.indd 4 23-09-2021 15:28:08

छाती, पोटावर हे पुरळ दिसतात. बोटाने दाबल्यावर ते निघून जातात. मात्र भारतात हे फार पाहायला मिळत नाही. विषमज्वराचा ताप योग्य वेळेला उपचार न केल्यास गुंतागुंतीचा होऊन आतड्यात आणि मेंदूत गुंतागुंत दाखवू शकतो.

**विडाल टेस्ट :** तापाच्या दुसऱ्या आठवड्यात ७ ते १० दिवसाच्या अंतराने केलेल्या दोन वेगवेगळ्या विडाल चाचण्यांमध्ये तिचे प्रमाण चौपट वाढताना दिसले तरच त्याचा योग्य निष्कर्ष काढता येतो. म्हणून १:३२०

**विषमज्वर ताप तापाचा चढत्या जीन्याप्रमाणे दिसणारा आलेख**
**प्रतिदिन ताप थोडाथोडा वाढत जातो.**




आकृती २ : तापाचा तक्ता

या एकाच रिपोर्ट वरून मुलाला विषमज्वर आहे असे म्हणता येत नाही. तसेच पूर्वी घेतलेली लस किंवा इतर जिवाणूंचे ताप यामुळे या तपासणी वर परिणाम होऊ शकतो. आपण ब्लड कल्चरचा रिपोर्ट येईपर्यंत थांबावे, हा तुमच्या डॉक्टरांनी दिलेला सल्ला योग्यच आहे. ब्लड कल्चर मध्ये लॅबोरेटरीमध्ये आपण हा विषमज्वराचा जंतु वाढवत असतो.

**ब्लड कल्चर :** पॉझिटिव दिसणारे ब्लड कल्चर हे पूर्णतः विश्वास ठेवण्यायोग्य आणि विषमज्वराचे निदान करण्यासाठीची सर्वात उत्तम तपासणी होय. या तपासणीचा दुसरा फायदा असा की आपण दिलेली औषधे विषमज्वरावर नीट काम करतील का याचा अंदाजही ही तपासणी देते. मात्र कल्चर निगेटिव्ह असल्यास त्या मुलाला विषमज्वर नाही असे म्हणता येत नाही. कल्चरचा रिपोर्ट पॉझिटिव्ह येण्यासाठी आजारातला पहिला आठवडा हा सर्वात महत्त्वाचा असतो तसेच अगोदर अँटिबायोटिक किंवा प्रतिजैविके घेतली असल्यास कल्चरचा रिपोर्ट चुकीचा निगेटिव्ह येऊ शकतो. जर एखादे मूल आजारी असेल आणि वैद्यकीय तपासणीमध्ये डॉक्टरांना विषमज्वराची शंका वाटली तर डॉक्टर ब्लड कल्चरचा रिपोर्ट येईपर्यंत अँटिबायोटिक सुरू करू शकतात, कारण ब्लड कल्चर रिपोर्ट येण्यास ४८ तासाचा अवधी लागतो.

**Blood Cultures in Typhoid Fever**

- Bacteremia occurs early in the disease
- रक्तामधील जीवाणू पसरण्याचे प्रमाण सुरुवातीला जास्त असते
- ब्लड कल्चर पॉझिटिव्ह येण्याची शक्यता
  - पहिल्या आठवड्यात :९० टक्के
  - दुसऱ्या आठवड्यात :७५ टक्के
  - तिसऱ्या आठवड्यात :६० टक्के
  - चौथ्या आणि त्यानंतरच्या आठवड्यात २५ टक्के असते.



आकृती ३ : रक्तामधील जीवाणू

**प्रश्न (३)**

## माझ्या मोठ्या मुलीला विषमज्वर झाला आहे माझ्या धाकट्या मुलाला या मुलीपासून विषमज्वर होऊ शकतो का?

विषमज्वर अशुद्ध अन्न आणि पाण्यातून पसरतो, जे इतर आजार श्वसन मार्गाद्वारे किंवा थेट संपर्क आल्यामुळे होत असतात अशा पद्धतीने हा पसरत नसल्याने तुमच्या धाकट्या मुलाला विषमज्वर होण्याची शक्यता कमी आहे मात्र एका अशक्य कोटीमध्ये मुलीकडून मुलाला हा आजार जाऊ शकतो, उदा; जर तिने टॉयलेट चा वापर केल्यानंतर हात धुतले नाहीत आणि त्याच हाताने तिच्या भावाला पाणी दिले तर त्याला विषमज्वराची बाधा होऊ शकते.

**विषमज्वर टाळण्याचे उपाय**



हात स्वच्छ धुवा



पाणी उकळून प्या



भाज्या आणि फळे स्वच्छ धुवून वापरा



विषमज्वरविरोधी लस घ्या

**आकृती ४ :** विषमज्वर टाळण्याचे उपाय

प्रश्न (४)

## माझ्या मुलाला विषमज्वराची उपचार चालू आहेत. उपचार सुरु केल्यावरून त्याला किती दिवसांमध्ये ताप कमी यावा अशी अपेक्षा आहे?


एकदा बाल आरोग्य तज्ञांनी हे सिद्ध केले की तुमचे मूल विषमज्वराने त्रस्त आहे, की त्याला प्रतिजैविके म्हणजे ॲंटिबायोटिक सुरू केली जातात. एक पालक या नात्याने तुम्ही केव्हाही मुलाचा ताप कमी व्हावा या गोष्टीसाठी आतुर असता. ताप उतरला म्हणजे तुमच्या मुलाचा उपचाराला प्रतिसाद चांगला चालू आहे. मात्र इतर अनेक तापात ताप ज्या पद्धतीने दोन ते तीन दिवसात झटकन कमी येतो तसे येथे होत नाही.

विषमज्वराचा ताप हा हळूहळू कमी होतो आणि योग्य ते औषध योग्य त्या मात्रेमध्ये दिले असताना देखील ताप उतरण्यासाठी एक आठवड्याचा अवधी द्यावा लागू शकतो. यासाठीच आपण अशा वेळी धीर धरणे गरजेचे असते आणि डॉक्टरांकडे जाऊन गडबडीने उपचार पद्धती बदलण्याचा आग्रह धरण्याची गरज नसते.

मात्र काही वेळा विषमज्वराचे निदान खात्रीपूर्वक सांगता येत नसते, तेव्हा त्या मुलाला विषमज्वराच्या ऐवजी इतर काही ताप आहेत का हे बघण्यासाठी बाकी तपासण्या करणं गरजेचं असतं.




आकृती ५ : विषमज्वराची अकरा लक्षणे




आकृती ६ : विषमज्वरात दिसणारी लक्षणे

प्रश्न (५)

## माझ्या मुलाचा ताप कमी येत नसल्यामुळे डॉक्टरांनी त्याला भरती होण्यासाठी सल्ला दिला आहे माझ्या मुलाला भरती केव्हा करावे ?

विषमज्वराच्या सगळ्या रुग्णांना भरती करण्याची गरज नसते. विषमज्वराच्या काही केसेसमध्ये जर ताप कमी असला आणि त्याचे निदान लवकर झाले असले तर तोंडाने औषध देऊन तो बरा होऊ शकतो. हे खास करून जरा मोठ्या मुलांमध्ये शक्य असते. त्या मुलांनी औषधे वेळच्या वेळी घेऊन आणि त्यांना उलटी झाली नाही तर त्यांचा प्रतिसाद लवकर येतो.

प्रतिजैविके (सिरप किंवा गोळी) तोंडाने घेतल्यावर आतड्यामधून ती शोषली जातात आणि सर्व शरीरात पसरतात आणि त्यांचे काम सुरू होते. मात्र इथे एक लक्षात घेतले पाहिजे की विषमज्वर हा मुख्यत्वेकरून आतड्याचा आजार आहे, ज्यात आतड्यांना सूज आलेली असते आणि ती खूप चांगल्या पद्धतीने काम करत नाहीत, म्हणून काही वेळा योग्य ती औषधे निवडली असताना आणि दिली असतानादेखील ती रक्तात पुरेशा पद्धतीने मिसळत नाहीत आणि उपचार पद्धतीचा उपयोग होत नाही. अशा केसेसमध्ये हीच प्रतिजैविके इंजेक्शनद्वारे देऊन उपचार करावे लागतात. हे फक्त हॉस्पिटलमध्ये भरती करूनच शक्य असते.

जर मूल खूप अशक्त झाले असेल, खात नसेल आणि त्याला उलट्या होत असतील तर त्याला भरती करून ही प्रतिजैविके शिरेतून द्यावी लागतात. त्याचबरोबर त्यांना ताकदीसाठी ग्लुकोज किंवा सलाईनचे इंजेक्शन द्यावे लागते. विषमज्वरामध्ये काही रुग्णात गुंतागुंत होते, त्यांना पुर्ण उपचार करण्यासाठी हॉस्पिटलमध्ये भरती करावे लागते.



Ch-032.indd 8 23-09-2021 15:28:09

प्रश्न (६)

## माझ्या मुलाला विषमज्वर झाला असता त्याला कोणत्या प्रकारचा आहार द्यावा? कोणत्या प्रकारचे अन्न टाळावे? ती मांसाहार करू शकतात का?

विषमज्वरसारखा  जंतुसंसर्ग तुमच्या शरीराला कमकुवत करतो. अशावेळी मुलांना संतुलित, पचायला सोपा असा आहार द्यावा आणि हा आहार मूल बरे  होत असताना देखील चालू ठेवावा. कच्चे अर्धवट शिजलेले  पदार्थ,कच्च्या भाज्या, अशुद्ध दूध आणि दुधाचे पदार्थ देऊ नयेत. विषमज्वराने यकृताला देखील त्रास होत असतो त्यामुळे पचायला जड अन्न देऊ नये. मांसाहारामध्ये पुरेसे शिजवलेले मांस मुलाला देता येऊ शकते.

विषमज्वरात घेण्याचा आहार



आकृती ७ : विषमज्वरात घेण्याचा आहार

उष्मांक प्रतिदिन




एकूण उष्मांक
**२०००**

आकृती ८ : विषमज्वर आहार तक्ता



Ch-032.indd 9 23-09-2021 15:28:09

प्रश्न
(७)

## माझ्या मुलीला विषमज्वर झाला होता. मी तिला शाळेला कधी पाठवू शकते?

विषमज्वरात भरपूर थकवा येत असतो आणि तो पूर्णपणे जाण्यास काही दिवस जावे लागतात. पूर्ण बरे होण्यासाठी शरीराला विश्रांती मिळणे आवश्यक असते, तेव्हा उपचार पूर्ण झाल्यावर ती एक ते दोन आठवडे मुलाला विश्रांती मिळणं गरजेचं असतं. मुलाचं वय आणि आजाराचा गंभीरपणा यावर मुलाला शाळेत कधी पाठवावे हे ठरवता येते.

प्रश्न
(८)

## पूर्ण उपचार झाल्यावर आणि मूल पूर्ण बरे झाल्यावर देखील विषमज्वराच्या ताप उलटू शकतो का?

विषमज्वराचा ताप ५ ते १० % रुग्णांमध्ये योग्य ते उपचार आणि पुरेशी रिकव्हरी झाली असतानादेखील पुन्हा झालेला पाहायला मिळतो. त्याला ताप उलटणे किंवा relapse असे म्हणतात. शक्यतो करून ताप पूर्ण उतरल्यानंतर दोन ते तीन आठवड्यानंतर आपल्याला हा प्रकार पाहायला मिळतो आणि पहिल्या तापमानापेक्षा यावेळचा ताप थोडा कमी असतो. कधीकधी ताप उलटण्याचा प्रकार उपचार संपत असताना किंवा काही महिन्यांनीदेखील पाहायला मिळतो. विषमज्वराचा ताप उलटला असता त्याला तेच प्रतिजैविक योग्य त्या मात्रेत आणि योग्य त्या काळासाठी द्यावे. अगदी क्वचित पुन्हा पुन्हा पलटून येणारा विषमज्वराचा ताप काही महिने टिकू शकतो हे शक्यतो औषधोपचार कमी झाले असल्यास बघायला मिळते.

प्रश्न (९)

## माझ्या मुलीला एक वर्षांपूर्वी विषमज्वराच्या ताप आला होता तरी देखील मी तिला विषमज्वराची लस द्यावी का?

विषमज्वराची लस विषमज्वर झाला असतानासुद्धा द्यावी याचे कारण नैसर्गिक जंतुसंसर्ग होऊनही दीर्घकालीन प्रतिकारशक्ती त्या जंतुसंसर्गातून मिळत नाही. एकदा मूल बरे झाले की चार ते सहा आठवड्यात त्याला लस द्यावी




आकृती ९ : विषम ज्वर लस

प्रश्न (१०)

## विषमज्वराची लस घेतली असताना देखील माझ्या मुलाला विषमज्वर होऊ शकतो का?

प्रत्येक माणसाची शारीरिक क्षमता वेगवेगळी असल्यामुळे प्रत्येक जण लसीला वेगवेगळ्या पद्धतीने प्रतिसाद देत असतो म्हणून कुठलीही लस १०० % एखाद्या आजारापासून तुम्हाला संरक्षण देऊ शकत नाही. यासाठी लसीकरण झाल्यानंतरही विषमज्वराच्या ताप तुमच्या मुलाला येऊ शकतो. त्याचबरोबर पॅराटायफोइड हा विषमज्वर सारखाच दिसणारा ताप आहे जो लस घेतल्यावरदेखील होतो. याचे कारण ही लस विषमज्वर टाळते, पॅराटायफोइड नाही.




आकृती १० : विषमज्वर तापाची लस